रचनात्मक संघर्ष समिती, [महाराष्ट्र]
गंगाखेड जिल्हा परभणी.

एक निवेदन

ऐनवाडी गायरान अतिक्रमण प्रकरणी दलितावर बहिष्कार कार्यकर्त्यांवर हल्ला दलितांना व पिकांना संरक्षणाची रचनात्मक संघर्ष समितीची मागणी,

गंगाखेड – २०–जुलै–१९८९.

गंगाखेड तालुक्यातील ऐनवाडी या गावी दलितांना गायरानावर अतिक्रमण केल्यामुळे दलितावर बहिष्कार पडल्यामुळे वातावरण तंग असुन येथील दलितात भितीचे वातावरण पसरले आहे. दलितांना व उभ्या पिकांना संरक्षण देण्यांची मागणी रचनात्मक संघर्ष समितीने एका निवेदनाव्दारे जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे केली आहे.

या प्रकरणी सविस्तर हकीकत अशी की, ऐनवाडी येथील गायरान जमिनीवर तेथील दलितांनी १९७५–७८ सालापासुन अतिक्रमण केले आहे. संबंधित सज्जाचे तलाठी यांनी या प्रकरणी अत्यंत चुकीच्या पध्दतीने ७/१२ उतारा दिल्यामुळे तेंव्हाच त्यांना पट्टा मिळायला हवा पण मिळाला नाही. दरवर्षी तलाठी, तहसीलदार कडे अर्ज करुनही सदर. अतिक्रमणाची नोंद व दखल महसुल खात्याने न घेतल्यामुळे हे प्रकरण चिघळले आहे. या प्रकरणी महसुल खाते व संबंधीत तलाठी जबाबदार असल्याचा स्पष्ट आरोप रचनात्मक संघर्ष समितीने केला आहे.

१९८३ साली हे ऐन भाववीजेच्या दिवशी संघटनेच्या बैठकीवर हल्ला केला होता. १९८४ साली परत दलितावर बहिष्कार टाकला. तेंव्हाच दलितांनी त्यावर्षी या प्रकरणावरुन ६ दिवसांची शिक्षा पण भोगली आहे. १९८७ साली परत जुन मध्ये अतिक्रमण केल्यावर संघटनेचे कार्यकर्ते आप्पाराव मोरताटे व इतरांवर गावातील ह ह्डई सवर्णांनी हल्ला केलाहोता. व सतत तीन महिने बहिष्कार पडला होता. तेंव्हा आमरण उपोषणाची सुचना दिल्यावर तेंव्हा गंगाखेड चे आमदार ज्ञानोबा गायकवाड व शेतकरी कामगार पक्षाचे चिटणीस भाई लक्ष्मणराव गोळेगांवकर यांनी मध्यस्थ करुन बहिष्कार उठविला होता.

या वर्षी परेणी करुन १२–४–१९८९ रोजी परत तहसीलदार व तलाठी सज्जा गुळखांड यांना अतिक्रमणाची नोंद घेवुन संरक्षण दयावे अशी मागणी केली होती. मात्र तलाठी सज्जा गुळखांड यांनी या प्रकरणी हयगय केल्यामुळे हे प्रकरण चिघळले.

दि. १६-४-१९८९ रोजी सकाळी संघटनेचे कार्यकर्ते आप्पाराव मोरताटे यांना त्या गावाचे सरपंच सखाराम मारोती गायकवाड व पोलीस पाटील श्री रामराव संतोबा गायकवाड प्रतिष्ठीत नागरीक सिताराम दत्तात्रय गायकवाड व इतर वर लोकांनी घेवुन त्यांना शिवीगाळ देवुन मारहाण केली या प्रकरणी पालम पोलीस स्टेशन ला गुन्हा दाखल झाला असुन अतिक्रमकावर पण कार्यवाही झाली आहे. विशेष म्हणजे पोलीसांनी हल्ला करणा-या गावगुंडांना अटक करण्याऐवजी अतिक्रमकांनाच अटक केली.

सध्या गांवात प्रचंड सामाजिक तणाव असुन दलितांना संरक्षणाची गरज असुन तसेच या प्रकरणी या गांवाचे सरपंच सखाराम गायकवाड व पोलीस पाटील रामराव गायकवाड हेच तणावास कारणीभुत असुन त्यांना बडतर्फ करावे. तलाठी, सज्जा गुळखंड याना पण निलंबीत करावे अशी मागणी संघटनेने केली आहे.

या प्रकरणी शासनाने आणखी वेळी वाढु दयावयाची वाट न पहाता त्या अतिक्रमण प्रकरणी १९८९ पर्यंत ताबेदार असणा-यांना पट्टे दयावेत. व प्रश्न निकाली काढवावा. असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यांत आले आहे.

गंगाखेड तालुक्यातील सर्व पुरोगामी पक्ष व संघटना व सुजाण नागरीक यानी पण या प्रकरणी दलितांना पाठींबा दयावा व तणाव निवळण्यास व बहिष्कार उठवण्यांत मदत करावी.

प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकावर संघटनेचे सरचिटणीस श्रीनिवास कुलकर्णी चिटणीस सुनील खांडाळीकर व आप्पाराव मोरताटे यांच्या सहया आहेत.

| | | |
|---|---|---|
| [श्रीनिवास कुलकर्णी] | सुनिल खांडाळीकर | आप्पाराव मोरताटे, |
| सरचिटणीस | चिटणीस | |

प्रिय कृपया आपल्या संस्था/संघटनेच्या वतीने हे पत्र परभणी जिल्हाधिकारी यांना पाठवावे व त्याची एक प्रत संघटनेस पाठवावी हि विनंती

विषमता निर्मुलन समिती
जनता केंद्र, तुळशी वाडी, ताडदेव,
मुंबई-400 034.

स.न.
विनिमय संपर्क केंद्राकडे आलेले सदर पत्रक आपल्या माहितीसाठी व कारवाई साठी पाठविले आहेत

आपला
गजानन खातू